महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १३ वे, राजपत्र क्र. १४] गुरुवार ते बुधवार, एप्रिल २-८, २०२६ : चैत्र १२-१८, शके १९४८ [पृष्ठे - १४

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

	पृष्ठे
भाग एक-शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याच्याव्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	३९५ ते ३९७
संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले.	३९८ ते ४०६
भाग एक-अ (भाग चार-अ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहेत त्या व्यतिरिक्त) केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.	१४ ते १५

शासकीय अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

१

अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांजकडून
नगर विकास विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३१/१२/२०२५

आदेश

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६. :-

क्र. टिपीएस-३४२५/प्र.क्र.३८/२०२५/नवि-३० :- ज्याअर्थी, कळंब शहराची सुधारीत विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-३४९९/१२९/सिआर-३१/९९/युडी-३०, दि. ०१/०४/२००० अन्वये मंजूर केली असून ती दि. १८/१०/२००० पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौ. कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव येथील सर्व्हे नं. ९४ (अ) मधील क्षेत्र (यापुढे "उक्त आरक्षित जमीन" असे संबोधिले आहे.) 'आ.क्र.६३- खेळाचे मैदान' व 'आ.क्र.६४- प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान' आणि १२ मी. व १५ मी. विकास योजना रस्ता (यापुढे "उक्त आरक्षणे" असा उल्लेख केला आहे.) या प्रयोजनासाठी आरक्षित आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाचे समुचित प्राधिकरण कळंब नगरपरिषद, जि.धाराशिव आहे. (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असा उल्लेख केला आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त आरक्षित जमीन, उक्त विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या कालावधीत संपादन केली नाही;

आणि ज्याअर्थी, सौ. लता किसन अडसुळ यांनी उक्त आरक्षणांखालील उक्त आरक्षित जमीनीपैकी मौ. कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव येथील सर्व्हे क्र. ९४ (अ) मधील उक्त आरक्षणांनी बाधित (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) त्यांच्या मालकीच्या क्षेत्राबाबत, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* नुसार नियोजन प्राधिकरण असलेल्या उक्त समुचित प्राधिकरणावर उक्त आरक्षणांसंदर्भात उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* अन्वये दि.२१/०८/२०२० रोजी सूचना बजावली आहे. (यापुढे "उक्त सूचना" असा उल्लेख केलेला आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावल्यानंतरही उक्त समुचित प्राधिकरणाने, विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा त्या संपादन करण्यासंबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६(४) सह, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केली नाही;

आणि ज्याअर्थी, दरम्यानच्या कालावधीत कळंब शहराची दुसरी सुधारित विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.टिपीएस-३४२४/४१३/प्र.क्र.१०९/२०२४/ वि.यो.मंजूरी (भागशः)/नवि-३०, दि. २८/०५/२०२५ अन्वये भागशः मंजूर केली आहे. (यापुढे "उक्त सुधारीत विकास योजना" असे संबोधले आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त सुधारीत विकास योजनेमध्ये उक्त जमीन आ.क्र.३०/ 'खेळाचे मैदान' व आ.क्र.३१- 'प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान' आणि १२ मी. व १५ मी. विकास योजना रस्ता (यापुढे "उक्त सुधारीत आरक्षणे" असा उल्लेख केला आहे.) या प्रयोजनासाठी आरक्षित आहे;

आणि ज्या अर्थी, उक्त सूचना बजावल्यापासून, उक्त समुचित प्राधिकरणाने विहित कालावधीत उक्त जमीन संपादन केली नाही अथवा उक्त जमीन संपादन करण्यासबंधीची उक्त अधिनियमाचे कलम १२६ *(४)* सह भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वयेची भूसंपादनाची अधिसूचना विहित कालावधीत प्रसिध्द केलेली नाही. त्यामुळे या परिस्थितीत उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* मधील तरतूदीनुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणे व्यपगत झाले असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* नुसार प्राप्त अधिकारात राज्य शासन, खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्यानुसार, उक्त विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणे व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे. परिणामतः उक्त सुधारीत विकास योजनेतील उक्त जमीनीवरील उक्त सुधारीत आरक्षणे निष्प्रभ झाले आहे व अशाप्रकारे आरक्षणातून मुक्त झालेली जमीन या संबंधित जमीनमालकास विकास योजनेतील लगतच्या अनुज्ञेय भूवापराप्रमाणे अन्यथा अनुज्ञेय असलेल्या विकासाकरीता उपलब्ध होईल;

परिशिष्ट

अ.क्र.	गावाचे नांव तालुका व जिल्हा	जमिनीचा सर्व्हे क्र./ हिस्सा क्र.	उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये व्यपगत/ निष्प्रभ होणारे क्षेत्र	उक्त विकास योजनेतील व्यपगत होणारी आरक्षणे	उक्त सुधारीत विकास योजनेमधील निष्प्रभ होणारी आरक्षणे
१.	मौ.कळंब, ता. कळंब, जि. धाराशिव	सर्व्हे नं. ९४ (अ)	सुचनाकर्ते यांच्या मालकीचे एकूण बाधित क्षेत्र	आ.क्र.६३- 'खेळाचे मैदान' व 'आ.क्र.६४- प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान' आणि १२ मी. व १५ मी. विकास योजना रस्ता	आ.क्र.३० 'खेळाचे मैदान' व आ.क्र.३१ 'प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान' आणि १२ मी. व १५ मी. विकास योजना रस्ता

प्रस्तुत आदेशान्वये उक्त आरक्षणांमधून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणाऱ्या भाग नकाशाची प्रत मुख्याधिकारी, कळंब नगरपरिषद, जि. धाराशिव यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

सदरचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(प्रसाद रा. शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

BY THE UNDER SECRETARY TO GOVERNMENT

Government of Maharashtra

Urban Development Department

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mantralaya, Mumbai 400 032.

Dated : - 31/12/2025

ORDER

The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966:

No. TPS-3425/C.R.38/2025/UD-30 :- Whereas, the Revised Development Plan of Kalamb has been sanctioned by the Government under section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act. No.XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No. TPS/3499/129/CR-31/99/UD-30 dt. 01/04/2000 and has come into force with effect from dt. 18/10/2000 (hereinafter referred to as "the said Development Plan") ;

And whereas, in the said Development Plan, the land bearing Survey No.94(A) of Mauje Kalamb, Dist. Dharashiv (hereinafter referred to as "the said Reserved Land") is reserved for 'Site No. 63- Play Ground', 'Site No. 64- Primary School & Play Ground' and 12 Mtr & 15 Mtr DP Road, (hereinafter referred to as "the said Reservations");

And whereas, the Kalamb Municipal Council is "Appropriate Authority" for the said Reservation. (hereinafter referred to as "Appropriate Authority")

And whereas, the said Reserved Land has not been acquired by yhe said Appropriate Authority within ten years from the date on which the said Development Plan came into force;

And whereas, Sau. Lata Kisan Adasul, the Owner of the land bearing Survey No. 94(A) of Mauje Kalamb, Dist. Dharashiv (hereinafter referred to as "the said Land") of the said Reserved Land, in reference to the Said Reservations, had served a notice dated 21/08/2020 under section 127(1) of the said Act to the said Appropriate Authority, being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Notice"); `

And whereas, even after service of the said Notice as aforesaid, the said Land had neither been acquired, within prescribed time period nor the Notification of land acquisition required under section 126 (4) of the said Act, read with Section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, has been published by the said Appropriate Authority within prescribed time period from the date of the service of said Notice under sub-section (1) of section 127 of the said Act;

And whereas, in the meantime, the Second Revised Development Plan of Kalamb has been partially sanctioned under Section 31 of the said Act, by the Urban Development Department vide Notification No. TPS-3424/413/C.R.109/2024/ DP Sanction (Part)/UD-30, dated 28/05/2025. (Hereinafter referred to as "the said Revised Development Plan") ;

And whereas, in the said Revised Development Plan, the said land is reserved 'Site No. 30- Play Ground', 'Site No. 31- Primary School & Play Ground' and 12 Mtr & 15 Mtr DP Road (hereinafter referred to as "the said Revised Reservations").

And whereas, it is observed that, the said Land had neither been acquired, within prescribed time period from the date of service of Notice, nor Notification of land acquisition required under section 126 *(4)* of the said Act, read with section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, been published within prescribed time period by the said Appropriate Authority. And, in consequence thereof, the Government of Maharashtra is of opinion that, the said Reservations on the said Land stands lapsed as per the provisions of section 127 *(1)* of the said Act;

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(2)* of section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby notifies that the said Reservations on the said Land stands lapsed. Consequently, the said Revised Reservations on the said Land in the said Revised Development Plan has become ineffective, as mentioned in the annexure given below, and the said Land so released will be available to the owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the Development Plan.

ANNEXURE

Sr. No.	**Name of the Village, Taluka and Dist.**	**Survey No./ Hissa No.**	**Area lapsed/ under section 127 (2) of the said Act**	**The lapsed reservations in the said Development Plan**	**The reservations rendered ineffective under the said Revised Development plan.**
1	Mauje Kalamb, Dist. Dharashiv	Survey No. 94 (A)	Total Affected Area Owned by The Noticer	'Site No. 63- Play Ground', 'Site No. 64- Primary School & Play Ground' and 12 Mtr & 15 Mtr DP Road	'Site No. 30- Play Ground', 'Site No. 31- Primary School & Play Ground' and 12 Mtr & 15 Mtr DP Road

A copy of the Part Plan, showing the area of the said Reservations which has been lapsed/ineffective *vide* this Order, is available in the office of the Chief Officer, Kalamb Municipal Council, Dist. Dharashiv during office hours on all working days for inspection of public for the period of One month.

This Order shall also be published on the Govt. website www.maharashtra.gov.in (Acts & Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra.

(Prasad R. Shinde)
Under Secretary to Government

संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

२

उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) लघु पाटबंधारे, बीड यांजकडून

भुमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पादर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ चे कलम ११ नुसार अधिसूचना

दिनांक - १७/०३/२०२६

क्र.२०२६/एलएनक्यु/एसआर/०२/२००८.– ज्याअर्थी,महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागाची अधिसुचना क्र.मिस/**११/२०१४/सीआर/७७/अ२ दिनांक १९ जानेवारी २०१५** (यास यापुढे सदर अधिसुचना असे संबोधले जाईल) भुमी संपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पादर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम ३ पोटकलम ई अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन असे अधिसुचित केले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ३(झअ) अन्वये सार्वजनिक जमिनीच्या संपादनाबाबत ५०० हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र असल्यास सदर जिल्हयाचा जिल्हाधिकारी या कायद्यान्वये अंमलात आणावयाच्या कार्यवाहीसाठी समुचित शासन असल्याचे मानले जाईल.

त्या अर्थी,सदर अधिसुचने अन्वये जिल्हाधिकारी,बीड हे समुचित शासन आहे. त्या अर्थी,परिशिष्ट १ मध्ये नमुद जमिन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यकता आहे. किंवा आवश्यकता भासु शकते तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्या अर्थी सदर कायद्याचा कलम ११ उपकलम (१) अन्वये अधिसुचीत करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमिन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्याअर्थी,परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटूंबासाठी प्रस्तावित जमिन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी,परिशिष्ट ४ मध्ये समाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी,परिशिष्ट ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उपकलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशिल देण्यात आला आहे.

त्या अर्थी, सदर कायद्याच्या कलम ११ उपकलम (४) अन्वये असे जाहिर करण्यात येते की, सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पुर्ण होईल अशा वेळेपर्यंत कोणतीही व्यक्ती,प्राथमिक अधिसुचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा कोणताही व्यवहार/हस्तांतर नाही किंवा कोणताही व्यवहार/हस्तांतर करविणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसुचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमीन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने,या तरतुदीचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११ चे उपकल (५) व भुमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ चे कलम १० उपनियम (३) अन्वये जिल्हाधिकारी विहीत करण्यात येईल त्याप्रमाणे भुमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल.आणि ज्या अर्थी,सदर कायद्याचे कलम ३ उपकलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी,बीड हे समुचित शासन असल्याने **उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) लघु पाटबंधारे,बीड** यांना जिल्हाधिकारी यांचे वतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

परिशिष्ट १

जमिनीचे वर्णन

गावाचे नांव :-गाव तलाव क्र.०६ मौजे मुगगांव (वसंतवाडी) ता.पाटोदा जिल्हाः-बीड

अ.क्र.	स.नं./ग.नं.	क्षेत्र (हे.आर)
१	३२३ पै.	०.२०
२	३२३ पै.	०.०५
	एकुण-	**०.२५**

परिशिष्ट २

प्रकल्पाचे नांव :- गाव तलाव क्र.०६ मौजे मुगगांव (वसंतवाडी) ता.पाटोदा
प्रकल्पाचे विवरणः- गाव तलाव क्र.०६ मौजे मुगगांव (वसंतवाडी) ता.पाटोदा
सामाजिक फायदे :- जलसंधारण
(पाणी साठा,आर्थिक,रोजगार व इतर फायदे)

परिशिष्ट ३

पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण

गावाचे नांव :-गाव तलाव क्र.०६ मौजे मुगगांव (वसंतवाडी) ता.पाटोदा जिल्हाः-बीड

अ.क्र.	स.नं./ग.नं.	क्षेत्र (हे.आर)
	लागु नाही.	

टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) लघु पाटबंधारे, बीड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

परिशिष्ट ४

प्रशासक नियुक्तीचे विवरण

१) प्रशासकाचे पदनाम :- लागू नाही
२) प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता :- लागू नाही.
३) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती केली ते नमुद करावेः- लागू नाही.

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उपकलम (१) खाली अधिसुचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसुचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत **उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) लघु पाटबंधारे,बीड** यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

दिनांक : १७/०३/२०२६
ठिकाण : बीड

(सतीश धुमाळ)
उपजिल्हाधिकारी (भुसंपादन)
लघु पाटबंधारे,बीड.

३

उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) लघु पाटबंधारे, बीड यांजकडून

नविन भुसंपादन कायदा -२०१३ च्या कलम १९(१) खालील

अधिसूचना जिल्हाधिकारी, बीड यांचे कार्यालय, जि.बीड

(भुमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम -२०१३ नुसार) जमीन संपादन गाव तलाव क्रमांक ०८मौजे उंबरविहीरा (सस्तेवस्ती) ता.पाटोदा जि.बीड साठी भुसंपादन

दिनांक :- १६.०२.२०२६

क्रमांक-२०२६/एलएनक्यु/एसआर २१/२००६.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यास भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोटकलम (१)व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसुचना, महसुल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक दिनांक १९ जानेवारी २०१५ अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूचि एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीचा, अनुसुचि दोन मध्ये अधिक तपशीलवार विनीर्दिष्ठ केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याचे, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे या बाबत खात्री पटली आहे, आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषीत करण्यात येत आहे. आणि ज्याअर्थी अनुसुची तिन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुर्नवसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषीत केले असुन,पुनर्वसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश अनुसुचि चार मध्ये विनिर्दिष्ट केले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी,उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भुसंपादन ल.पा.बीड यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन

गावाचे नांव :- गाव तलाव क्रमांक ०८ मौजे उंबरविहीरा (सस्तेवस्ती) ता.पाटोदा जि.बीड

अ.क्र.	स.नं./ग.नं.	क्षेत्र (हे.आर)
१	९६ पैकी	१.७६
२	९६ पैकी	०.०९
३	९४ पैकी	०.६६
	एकुण	**२.५१**

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव :गाव तलाव क्रमांक ०८ मौजे उंबरविहीरा (सस्तेवस्ती) ता.पाटोदा जि.बीड.

प्रकल्पाच्या कामाचे वर्णनः-गाव तलाव क्रमांक ०८ मौजे उंबरविहीरा (सस्तेवस्ती)ता.पाटोदा जि.बीड या सार्वजनिक कामाचे प्रयोजन
सामाजिक फायदे :-शेती पिकासाठी पाणी व जनावरांना पाणी व इतर सार्वजनिक हितार्थ

अनुसूची- तीन

पुर्नवसाहत क्षेत्राचे वर्णन गावाचे नांव :-गाव तलाव क्रमांक ०८ मौजे उंबरविहीरा (सस्तेवस्ती) ता.पाटोदा जि.बीड

अ.क्र.	स.नं./ग.नं.	क्षेत्र (हे.आर)
	लागु नाही	

अनुसूची - चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश.) दिनांक १३मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसुचना क्रमांक संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र.३/अ-२,नुसार उक्त अधिनियमाचे कलम-१० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागु करण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.

टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) ल.पा.बीड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :- १६.०२.२०२६
ठिकाण :- बीड

(सतीश धुमाळ)
उपजिल्हाधिकारी भुसंपादन,
लघुपाटबंधारे बीड.

४

उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) लघु पाटबंधारे, बीड यांजकडून

नविन भुसंपादन कायदा -२०१३ च्या कलम १९(१) खालील

अधिसूचना जिल्हाधिकारी, बीड यांचे कार्यालय, जि.बीड

(भुमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम -२०१३ नुसार)

जमीन संपादन गाव तलाव क्रमांक ०९ मौजे उंबरविहीरा ता.पाटोदा जि.बीड साठी भुसंपादन

दिनांक :- १६.०२.२०२६

क्रमांक-२०२६/एलएनक्यु/एसआर ०१/२०१३.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यास भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोटकलम (१)व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसुचना, महसुल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक दिनांक १९ जानेवारी २०१५ अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूचि एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीचा, अनुसुचि दोन मध्ये अधिक तपशीलवार विनीर्दिष्ठ केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याचे, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे या बाबत खात्री पटली आहे, आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषीत करण्यात येत आहे. आणि ज्याअर्थी अनुसुची तिन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुर्नवसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषीत केले असुन,पुनर्वसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश अनुसुचि चार मध्ये विनिर्दिष्ट केले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी,उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भुसंपादन ल.पा.बीड यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन

गावाचे नांव :- गाव तलाव क्रमांक ०९ मौजे उंबरविहीरा ता.पाटोदा जि.बीड

अ.क्र.	स.नं./ग.नं.	क्षेत्र (हे.आर)
१	३६५ पैकी	०.०३
२	३६६ पैकी	०.०४
३	३६७ पैकी	०.०४
४	४०८ पैकी	०.१५
		०.०१
		०.१५
५	३४७ पैकी	०.३६
	एकुण	**०.७८**

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांवः- गाव तलाव क्रमांक ०९ मौजे उंबरविहीरा ता.पाटोदा जि.बीड.

प्रकल्पाच्या कामाचे वर्णनः-गाव तलाव क्रमांक ०९ मौजे उंबरविहीरा ता.पाटोदा जि.बीड या सार्वजनिक कामाचे प्रयोजन
सामाजिक फायदे :-शेती पिकासाठी पाणी व जनावरांना पाणी व इतर सार्वजनिक हितार्थ

अनुसूची- तीन

पुर्नवसाहत क्षेत्राचे वर्णन गावाचे नांव :-गाव तलाव क्रमांक ०९ मौजे उंबरविहीरा ता.पाटोदा जि.बीड

अ.क्र.	स.नं./ग.नं.	क्षेत्र (हे.आर)
	लागु नाही	

अनुसूची - चार

(पुर्नवसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश.) दिनांक १३मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसुचना क्रमांक संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र,३/अ-२,नुसार उक्त अधिनियमाचे कलम-१० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागु करण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.

टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) ल.पा.बीड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :- १६.०२.२०२६
ठिकाण :- बीड

(सतीश धुमाळ)
उपजिल्हाधिकारी भुसंपादन,
लघुपाटबंधारे बीड.

५

उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) लघु पाटबंधारे, बीड यांजकडून

नविन भुसंपादन कायदा -२०१३ च्या कलम १९(१) खालील

अधिसूचना जिल्हाधिकारी, बीड यांचे कार्यालय, जि.बीड

(भुमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम -२०१३ नुसार) जमीन संपादन गाव तलाव क्रमांक ०६मौजे सावरगाव ता.पाटोदा जि.बीड साठी भुसंपादन

दिनांक :- १७.०३.२०२६

क्रमांक-२०२६/एलएनक्यु/एसआर ५३/२००७.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यास भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोटकलम (१)व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसुचना, महसुल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक दिनांक १९ जानेवारी २०१५ अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूचि एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीचा, अनुसुचि दोन मध्ये अधिक तपशीलवार विनीर्दिष्ठ केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याचे, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे या बाबत खात्री पटली आहे, आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषीत करण्यात येत आहे. आणि ज्याअर्थी अनुसुची तिन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुर्नवसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषीत केले असुन,पुनर्वसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश अनुसुचि चार मध्ये विनिर्दिष्ट केले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी,उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भुसंपादन ल.पा.बीड यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन

गावाचे नांव :- गाव तलाव क्रमांक ०६मौजे सावरगाव ता.पाटोदा जि.बीड

अ.क्र.	स.नं./ग.नं.	क्षेत्र (हे.आर)
१	१६३ पैकी	०.१७
२		०.१७
३	१६५ पैकी	०.२९
	एकुण	**०.६३**

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव : गाव तलाव क्रमांक ०६मौजे सावरगाव ता.पाटोदा जि.बीड.

प्रकल्पाच्या कामाचे वर्णनः-गाव तलाव क्रमांक ०६मौजे सावरगाव ता.पाटोदा जि.बीड या सार्वजनिक कामाचे प्रयोजन

सामाजिक फायदे :-शेती पिकासाठी पाणी व जनावरांना पाणी व इतर सार्वजनिक हितार्थ

अनुसूची- तीन

पुर्नवसाहत क्षेत्राचे वर्णन गावाचे नांव :-गाव तलाव क्रमांक ०६मौजे सावरगाव ता.पाटोदा जि.बीड

अ.क्र.	स.नं./ग.नं.	क्षेत्र (हे.आर)
	लागु नाही	

अनुसूची - चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश.) दिनांक १३मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसुचना क्रमांक संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र,३/अ-२,नुसार उक्त अधिनियमाचे कलम-१० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागु करण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.

टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) ल.पा.बीड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :- १७.०३.२०२६
ठिकाण :- बीड

(सतीश धुमाळ)
उपजिल्हाधिकारी भुसंपादन,
लघुपाटबंधारे बीड.

६

उपजिल्हाधिकारी भुसंपादन, लघुपाटबंधारे बीड, यांजकडून नविन भुसंपादन कायदा -२०१३ च्या कलम १९(१) खालील अधिसूचना जिल्हाधिकारी, बीड यांचे कार्यालय, जि.बीड (भुमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम -२०१३ नुसार) जमीन संपादन गाव तलाव मौजे वडझरी (विकासवस्ती)ता.पाटोदा जि.बीडसाठी भुसंपादन

दिनांक :- २५.०३.२०२६

क्रमांक-२०२६/एलएनक्यु/एसआर १०/२००२.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यास भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोटकलम (१)व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसुचना, महसुल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक दिनांक १९ जानेवारी २०१५ अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूचि एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीचा, अनुसुचि दोन मध्ये अधिक तपशीलवार विनीर्दिष्ठ केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याचे, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे या बाबत खात्री पटली आहे, आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषीत करण्यात येत आहे. आणि ज्याअर्थी अनुसुची तिन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुर्नवसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषीत केले असुन,पुनर्वसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश अनुसुचि चार मध्ये विनिर्दिष्ट केले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी,उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भुसंपादन ल.पा.बीड यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन

गावाचे नांव :- गाव तलाव मौजे वडझरी (विकासवस्ती) ता.पाटोदा जि.बीड

अ.क्र.	स.नं./ग.नं.	क्षेत्र (हे.आर)
१	९१७	०.०६
२	९२० पै.	०.६५
३	९२० पै.	०.५५
४	९२१ पै.	०.३८
५	९२५ पै.	०.५४
६	९२५ पै.	०.१७
	एकुण	**२.३५**

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव :गाव तलाव मौजे वडझरी (विकासवस्ती) ता.पाटोदा जि.बीड.

प्रकल्पाच्या कामाचे वर्णन:-गाव तलाव मौजे वडझरी (विकासवस्ती) ता.पाटोदा जि.बीड या सार्वजनिक कामाचे प्रयोजन

सामाजिक फायदे :-शेती पिकासाठी पाणी व जनावरांना पाणी व इतर सार्वजनिक हितार्थ

अनुसूची- तीन

पुर्नवसाहत क्षेत्राचे वर्णन गावाचे नांव :-गाव तलाव मौजे वडझरी (विकासवस्ती) ता.पाटोदा जि.बीड

अ.क्र.	स.नं./ग.नं.	क्षेत्र (हे.आर)
	लागु नाही	

अनुसूची - चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश.) दिनांक १३मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसुचना क्रमांक संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र,३/अ-२,नुसार उक्त अधिनियमाचे कलम-१० क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागु करण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.

टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) ल.पा.बीड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :- २५.०३.२०२६
ठिकाण :- बीड

(सतीश धुमाळ)
उपजिल्हाधिकारी भुसंपादन,
लघुपाटबंधारे बीड.

७

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांजकडून

अधिसूचना

जा.क्र.३१२७/जिउनि/प्रशा-१/नवभारत शेत.कृ.प्र.सं बागझरी/नोंदणी /२०२५ दिनांकः-३१ ऑक्टोबर, २०२५ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड हे या पत्राद्वारे अधिसूचित करीत आहेत की, **नवभारत शेतकरी शेतमाल कृषी प्रक्रिया सहकारी संस्था म.बागझरी ता.अंबाजोगाई जि. बीड** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली असून जिचा **नोंदणी बीएचआर/बीएचआर/पीआरजी/(ए)/१०८/२०२५ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५** असा आहे.

उक्त अधिनियमाचे कलम १२ (१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६२ चे नियम १० (१) अन्वये जिचे वर्गीकरण **"प्रक्रिया संस्था"** उपवर्गीकरण **" कृषी प्रक्रिया संस्था"** - असे करण्यात आले आहे.

(सतीश तोटावार)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, बीड.

८

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांजकडून

अधिसूचना

जा.क्र.३१२९/जिउनि/प्रशा-१/शेतकरी कृ.मा.प्र.सं परळी(वै)/नोंदणी/२०२५ दिनांक :- ३१ ऑक्टोबर, २०२५ जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड हे या पत्राद्वारे अधिसुचित करीत आहेत की, **शेतकरी कृषीमाल प्रक्रिया सहकारी संस्था म.परळी(वै) ता.परळी(वै) जि. बीड** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली असून जिचा **नोंदणी क्रमांक बीएचआर/बीएचआर/पीआरजी/(ए)/१०९/२०२५ दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५** असा आहे.

उक्त अधिनियमाचे कलम १२ (१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १० (१) अन्वये जिचे वर्गीकरण **"प्रक्रिया संस्था"** उपवर्गीकरण **" कृषी प्रक्रिया संस्था"** - असे करण्यात आले आहे.

(सतीश तोटावार)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, बीड.

९

सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई यांजकडून

अधिसूचना

जा.क्र.१२६३ सनिअ/वि-२/प्रशेप्रससं/२०२५ दिनांक :- ११/०९/२०२५ सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अंबाजोगाई, जि. बीड या पत्राद्वारे अधिसुचित करीत आहेत कि प्रगती शेतमाल प्रक्रीया सहकारी संस्था **म. हनुमंतवाडी ता. अंबाजोगाई जि. बीड** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आलेली आहे. उक्त नियमांचे कलम १२ (१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६० चे नियम १० (१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण **प्रक्रीया संस्था** असुन उपवर्गीकरण **कृषी प्रक्रीया संस्था आहे.**

(संतोष भंडारी)
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड

१०

सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई यांजकडून

अधिसूचना

जा.क्र.१११२ सनिअं/विकास-२/पो.नि.दु/श्रीसनासप/२०२५ दिनांक :- २८/०७/२०२५ सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अंबाजोगाई, जि. बीड या पत्राद्वारे अधिसुचित करीत आहेत कि, भाग्योदय जनविकास ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था **म. पट्टीवडगांव ता. अंबाजोगाई जि. बीड** या संस्थेच्या नावात बदल करणे बाबत उपविधी दुरुस्तीचा प्रस्ताव महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५ आणि नियम १९६१ मधील नियम १४ अन्वये या कार्यालयाच्या स्तरावरुन मंजूर करण्यात आलेला आहे. सदर संस्थेचे सुधारित नाव श्री समर्थ नागरी सहकारी पतसंस्था मर्या. पट्टीवडगाव ता अंबाजोगाई जि. बीड असे करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १४ (२) अन्वये संस्थेच्या सुधारित नावास शासकीय राजपत्रात प्रसिध्दी देणे बाबत तरतुद नमूद केलेली आहे.

(संतोष भंडारी)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, अंबाजोगाई जि. बीड

११

सहायक निबंधक, सहकारी संस्था, अंबाजोगाई यांजकडून

अधिसूचना

जा.क्र.११९४सनिअ/वि.२/श्रीगग्राबिशेसपसं/२०२५ दिनांकः- २२/०८/२०२५ सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अंबाजोगाई, जि. बीड या पत्राद्वारे अधिसूचित करीत आहेत कि श्री गणेश ग्रामिण बीगर शेती सहकारी पतसंस्था म.जवळगाव **ता. अंबाजोगाई जि. बीड** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आलेली आहे.उक्त नियमाचे कलम १२ (१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६० चे नियम १० (१) अन्वये संस्थचे वर्गीकरण **साधन संपत्ती संस्था** असून उपवर्गीकरण **कर्ज देणाऱ्या साधन संपत्ती संस्था** आहे.

(संतोष भंडारी)
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड

१२

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांजकडून

अधिसूचना

जा.क्र.प्रशा-१/कामधेनु शेतमाल प्र.सं घाटनांदुर/नोंदणी /२४८१/२०२५ दिनांकः- १४ ऑगस्ट, २०२५ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड हे या पत्राद्वारे अधिसूचित करीत आहेत की, कामधेनु शेतमाल प्रक्रिया सहकारी संस्था म. घाटनांदुर ता.अंबाजोगाई जि. बीड ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली असून जिचा **नोंदणी बीएचआर/बीएचआर/पीआरजी/(ए)/१०७/२०२५ दिनांक १४ ऑगस्ट, २०२५** असा आहे.

उक्त अधिनियमाचे कलम १२ (१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १० (१) अन्वये जिचे वर्गीकरण **"प्रक्रिया संस्था"** उपवर्गीकरण **" कृषी प्रक्रिया संस्था"** - असे करण्यात आले आहे.

(सतीश तोटावार)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, बीड.

१३

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, (दुग्ध) धाराशिव यांजकडून

अधिसूचना

जा. क्र.सनिवा/नियो कुंडलिकराव माने दु.स.सं/सन-२०२५/१५५९ दिनांक 16/10/2025 :- सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, (दुग्ध) धाराशिव कडून असे अधिसुचित करण्यात येते की, श्री. कुंडलिक रामराव माने दुग्ध् व्यावसायिक सहकारी म.धोत्री ता.तुळजापूर,जि.धाराशिव. ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ च्या ९(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थेचे नियम क्रमांक १० (१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण कृषी संस्था असून उपवर्गीकरण इतर कृषि संस्था असे वर्गीकरण करण्यात आले आहे. संस्थेचे नोंदणी क्रं.डीएचए/टीपीआर/एजीआर/डी/१५२९/२०२५, दिनांक-१६/१०/२०२५ असा आहे.

धाराशिव :- दि. १६/१०/२०२५

(महेंद्र बनसोडे),
सहायक निबंधक
सहकारी संस्था,ता. (दुग्ध), धाराशिव.

१४

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, (दुग्ध) धाराशिव यांजकडून

अधिसूचना

जा. क्र.सनिवा/नियो कुंडलिकराव माने दु.स.सं/सन-२०२५/१५६१ दिनांक १६/१०/२०२५ :- सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, (दुग्ध) धाराशिव कडून असे अधिसुचित करण्यात येते की, संप्तश्रुंगी दुग्ध् व्यावसायिक सहकारी म.पाथरुड,ता.भूम जि.धाराशिव ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ च्या ९(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थेचे नियम क्रमांक १० (१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण कृषी संस्था असून उपवर्गीकरण इतर कृषि संस्था असे वर्गीकरण करण्यात आले आहे, संस्थेचे नोंदणी क्रं.डीएचए/बीएचए/एजीआर/डी/१५३०/२०२५, दिनांक-१६/१०/२०२५ असा आहे.

धाराशिव :- दि. १६/१०/२०२५

(महेंद्र बनसोडे),
सहायक निबंधक
सहकारी संस्था,ता. (दुग्ध), धाराशिव.

१५

उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी भोकरदन, यांजकडून

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९ (१) ची

अधिसुचना

क्रमांक २०२६/उविअ/भुसंपादन/पा.त.क्र. कुंभारझरी/सिआर-१९२३.- दिनांक ०१/०४/०२६. ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यात यापुढे ज्याचा निर्देश **उक्त अधिनियम** असा केला आहे, यांच्या कलम ११ च्या पोट कलमाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसुचना, **दिनांक ४/०३/२०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना** काढली आहे व शासन राजपत्रामध्ये दिनांक १३/०३/२०२५ रोजी प्रसिध्दी देण्यात आली आहे.

त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या **अनुसूचि एक** मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, **अनुसूची दोन** मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे. किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

जालना जिल्हयातील जिल्हाधिकारी जालना **कलम १५ च्या पोटकलम** (२) अन्वये दिलेला अहवाल,कोणता ही असल्यास,विचारात घेतल्या नंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची संपादीत करण्याची आवश्यकता आहे, या बाबत त्याची खात्री पटली आहे म्हणुन,उक्त अधिनियमाच्या **कलम १९ च्या पोटकलम (१)** च्या तरतुदी मध्ये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे. असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

ज्याअर्थी, **अनुसूची तीन** मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतच्या प्रयोजनासाठी पुनर्वसन क्षेत्र म्हणुन निर्धारीत केले असल्याचे या द्वारे घोषित केले असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेच्या सारांश **अनुसूची चार** मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या **कलम ३ (छ)** अन्वये सुचीत शासन असलेला जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमा मध्ये जिल्हाधिकारी यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी भोकरदन** यांना अधिसुचना काढण्यापुर्वी पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची -१

(जमीनीचे वर्णन)

गावाचे नाव:- मौजे कुंभारझरी ता. जाफ्राबाद जि. जालना

अ.क्र.	भुमापन किंवा गट क्रमांक	मोजणी प्रमाणे क्षेत्र (हे.आर.मध्ये)
१	८२	०.३२
२	८२	०.६१
३	१०८	०.१५
४	१७७	०.०५
	एकुण	१.१३

अनुसूची -२

प्रकल्पाचे नांव : खडकपुर्णा प्रकल्प देऊळगाव राजा

प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रा करिता **मौजे कुंभारझरी** ता जाफ्राबाद जि. जालना येथील जमीन संपादना बाबत.

प्रकल्पकार्याचे वर्णन : खडकपुर्णा प्रकल्प देऊळगाव राजा **मौजे कुंभारझरी ता जाफ्राबाद जि. जालना** येथील जमीन बुडीत क्षेत्राकरिता संपादना बाबत.

समाजास मिळणारा लाभ : या प्रकल्पामुळे **मौजे कुंभारझरी ता जाफ्राबाद जि. जालना** येथील जमीन ओलीतीखाली येणार आहे. खडकपुर्णा प्रकल्पामुळे त्या लाभक्षेत्रातील जमीनीचे पाणीपातळी भरपूर प्रमाणत वाढ होणार आहे तसेच गावाच्या पिण्याचा पाण्याचा जनावराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. या पाझर तलावाच्या कामामुळे रोजगारांची संधी मिळणार आहे. तसेच संपादना क्षेत्रालगतची जमीन ओलीत होणार असुन प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात लक्षणी वाढ होणार आहे व पर्यायाने खेड्यातील जीवनमानामध्ये सुधारणा होणार आहे.

अनुसूची -३

बाधीत व्यक्तीचे विस्थापन कररण्यात भाग पाडणारी कारणे – सदरचा प्रकल्प हा सिंचन क्षेत्रातील जमीन अधीकाधीक फायदेशीर उत्पन्न देणारी व लाभदायक व्हावी या साठी पाझर तलावाचे संपादन करण्यात आलेले आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम व सखोल शेतजमीनीवर असून त्यास शेतकऱ्यांनी संमती दिली आहे. यामध्ये कोणतेही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्यामुळे अथवा कोणतीही व्यक्ती विस्थापीत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

अनुसूची -४

(सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश)

लागु नाही

टिप:- उक्त जमिनीच्या नकाशाचे वर्णन **उपविभागीय अधिकारी भोकरदन जि. जालना** यांचे कार्यालयात निरीक्षणा करीता ठेवण्यात आला आहे.

ठिकाण :- भोकरदन

दिनांक:- ०१/०४/२०२६

बी.सरवनन, भा.प्र.से.
सहायक जिल्हाधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी भोकरदन.

१६

जिल्हाधिकारी नांदेड. यांजकडून

अधिसूचना कलम १९

दिनांक -०५/०२/२०२६

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३

क्रमांक २०२४/आरबी/डेस्क-३/भूसं/सिआर-८५

क्रमांक २०२४/उजिअ/लसिका/सिआर-१५.– ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नांदेड जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०)(यात यापुढे ज्याचा निर्देश **उक्त अधिनियम** असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसुचना **पान क्र.२५४१-२५४२ वर दिनांक २०-२६ नोव्हेंबर २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे** आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूचि एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी **कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड** विभागाच्या खर्चाने करण्याची आवश्यकता आहे.

आणि ज्याअर्थी, नांदेड (जिल्हयाच्या) जिल्हाधिका-याने ,कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल,कोणताही असल्यास,विचारात घेतल्या नंतर,उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे या बाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणुन,उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये,उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारीत केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असुन, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लसिका नांदेड यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची एक

(संपादित करावयाच्या जमीनीचे वर्णन)

गावाचे नाव:- गाडेगाव ता. जि.नांदेड

अ.क्र.	भुमापन किंवा गट क्रमांक	संपादीत क्षेत्र (चौ.मी.मध्ये)
१	१७८	२२७
२	१७५	१५९
३	१८४	१६०
४	१४४	१४८
५	२०९	३३४
६	२०७	१०६
७	१३१	२३४
८	१३०	७०
	एकुण	१४३८

अनुसूची दोन

(सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपा बाबत विवरण)

प्रकल्पाचे नांव : भूसंपादन प्रस्ताव प्रमुख जिल्हा मार्ग ८३ कि.मी. ० ते ९३.७०० ब्राम्हणवाडा ,आमदुरा, माळकौठा या गावातील वळण रस्ता बांधकामासाठी मौ.गाडेगाव ता.जि.नांदेड

प्रकल्पाचे नांव : भूसंपादन प्रस्ताव प्रमुख जिल्हा मार्ग ८३ कि.मी. ० ते ९३.७०० ब्राम्हणवाडा ,आमदुरा, माळकौठा या गावातील वळण रस्ता बांधकामासाठी मौ.गाडेगाव ता.जि.नांदेड

समाजाला होणारे लाभ :- दळण वळण

अनुसूची तीन

(पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन)

गावाचे नाव - गाडेगाव ता. नांदेड जिल्हा नांदेड

लागु नाही

अनुसूची चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

लागु नाही

टिपः-उक्त जमीनीच्या नकाशाचे निरीक्षण उपजिल्हाधिकारी भूसंपादन लघुसिंचन कामे नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड येथील कार्यालयात करता येईल.

दिनांकः- ५/०२/२०२६

ठिकाणः- नांदेड

स्वा/-

(राहुल कर्डिले)

जिल्हाधिकारी नांदेड.

१७

उपजिल्हाधिकारी भूसंपादन लसिका, नांदेड यांजकडून

कलम ११ खालील अधिसुचना शुद्धीपत्रक

दिनांक २५.०३.२०२६

क्रमांक २०२१/उजिअ/लसिका/सिआर-२७ .— या कार्यालयाची भूमीसंपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतचा हक्क अधिनियम २०१३ च्या कलम ११ खालील अधिसुचना क्रमांक २०२१/उजिअ/लसिका/सिआर-२७ ही महाराश्ट्र शासन राजपत्रात दिनांक २३ ते २९ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध झाली आहे. त्यात खालील प्रमाणे दुरुस्ती वाचावी.

अनुसूची

गावाचे नाव- वासरी ता. मुदखेड जि.नांदेड

करीता			**वाचावे**	
अ.क्र.	ग.क्र.	संपादीत क्षेत्र हे.आर	गट क्र.	संपादीत क्षेत्र हे.आर
१	३६	०.०३	३६	०.१४
२	४	०.०९	४	०.४६
३	३	०.२०	३	०.३५
४	२	०.०३	२	०.१५
५	१	०.०४	१	०.१६
६	६	०.०४	६	०.१६
७	८	०.०२	८	०.०८
८	९	०.०२	९	०.०६
९	४२२	०.०८	४२२	०.४४
१०	४२०	०.०९	४२०	०.३८
११	४२९	०.०५	४२९	०.०३
१२	-	-	४२९	०.०४
१३	-	-	४२९	०.३०
१४	-	-	४२९	०.०१
१५	-	-	४२९	०.०८
१६	४१३	०.०५	४१३	०.०६
एकुण		**०.७४**		**२.९०**

(प्रियांका पवार)

उपजिल्हाधिकारी भूसंपादन

लसिका, नांदेड

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२ वे, राजपत्र क्र. ७] गुरुवार ते बुधवार, एप्रिल २-८, २०२६ : चैत्र १२-१८, शके १९४८ [किंमत : ०.०० रुपये

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक–अ-छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याव्यतिरिक्त केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले व महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना)

टीप :–प्रत्येक अधिसूचनेच्या आधी मधोमध जे ठळक आकडे छापलेले आहेत ते ह्या साप्ताहिक राजपत्रात छापलेल्या अधिसूचनांचे अनुक्रमांक आहेत.

१

मुख्याधिकारी तथा प्रशासक नगर परिषद उमरगा यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सूचना

जाहिर सूचना

क्र. ७९५/२०२६.– ज्या अर्थी उमरगा शहराची (मूळ व वाढीव हद्द) दुसरी सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ३१ (१) अन्वये महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाची **अधिसूचना क्र. टीपीएस-३४०९/५७३/सी-आर/७३/२००९/ नवि-३० दि. ०४ एप्रिल २०१२** अन्वये मंजूर झाली असून, ती दि.१५/०५/ २०१२ पासून अंमलात आली आहे.

ज्या अर्थी, उमरगा नगर परिषदेने प्रशासकीय **ठराव क्र. ०५ दिनांक ०३/११/२०२५** अन्वये मंजूर विकास योजना मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये खालील फेरबदल करावयाचे ठरविले आहे.

मंजुर विकास योजनेनुसार प्रयोजन

उमरगा शहराच्या मंजुर विकास योजनेतील सर्वे न. १० मधील शेती तथा नाविकास विभाग (अंदाजे क्षेत्रफळ ०१ हेक्टर ३६ आर) (भाग नकाशात दर्शविल्याप्रमाणे)

प्रस्तावित फेरबदल

उमरगा शहराच्या मंजूर विकास योजनेतील सर्वे न. १० मधील शेती तथा नाविकास विभाग (अंदाजे क्षेत्रफळ ०१ हेक्टर ३६ आर) हा विभाग (भाग नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे) वगळून रहिवाशी विभागामध्ये समाविष्ट करणे.

वरील बदल विकास योजनेच्या भाग नकाशावर हिरव्या रंगात दर्शविण्यात आलेले आहेत आणि ज्याअर्थी उक्त फेरबदलाबाबत जनतेकडून सुचना व हरकती मागविण्याकरिता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्या अर्थी जे नागरिक ही सुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत त्यांच्या सूचना आणि हरकती लेखी स्वरूपात उमरगा नगर परिषद, उमरगा कार्यालयात सादर करतील त्यांचा विचार उक्त प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करणेपूर्वी उमरगा नगर परिषद करेल.

उक्त विकास योजनेत प्रस्तावित केलेला फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरीकांच्या अवलोकनार्थ नगर परिषदेच्या कार्यालयात सर्व कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध असेल.

ठिकाण :- उमरगा
दि.२५/०३/२०२६

रामकृष्ण जाधवर,
मुख्याधिकारी तथा प्रशासक,
नगरपरिषद उमरगा.

BY CHIEF OFFICER & ADMINISTRATOR MUNICIPAL COUNCIL, UMARGA

PUBLIC NOTICE

By The Administrator Municipal Council Umarga Public Notice Under section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act 1966.

Date: 25/03/2026

Public Notice

Out No./792/2026 .----- Whereas the (old + Additional) second revised development plan, of Umarga has been sactioned by the Government of Maharashtra in Urban Development **No TPS-3409/ 573/CR-73/2009/UD-30 Date- 04/04/2012** and came into effect from 15/05/2012

Whereas the Umarga Municipal Council under its Administration resolution No. 05 Date- 03/11/2025 has resolved to effect the following modification under section 37 of the Maharashtra regional and town planning Act 1966 (hereinafter reffered to as the "said Act") in the above mentioned second revised plan viz.

Provision as per sanctioned D.P.

Land Admesasuring tentativly 1 Ha. 36 R. in Sy. No. 10 Green Zone (As shown in part plan)

Proposed Modification

Green Zone (area Admeasuring tentatively 01 Ha. 36 R.) in Site no. 10 is proposed to be deleted and Zone released to be included in residential zone.

And whereas, the notice is hereby published as required under section 37 of the said Act for inviting suggestions and objections from public on this modification. Those person who will give their suggestions and objections in writing to the Umarga municipal council within one month from the publication of this notice, in Maharashtra Government Gazette will be considered by the council before submitting the said proposal to Government for sanction.

The part plan showing the proposed modification to the said development plan is kept open for inspection of public in the office of Umarga municipal council on all the working days.

Place:- Umarga

Date. 25/03/2026

Ramkrushn Jadhavar
Chief Officer & Administrator
Municipal Council, Umarga.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.